स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत 'इतिहास' विषयातील पीएचडी पदवी मिळविण्यासाठी.
सादर करावयाचा संशोधन आराखडा

"पश्चिम महाराष्ट्रातील जनआंदोलनाचा ऐतिहासिक अभ्यास"
विशेष संदर्भ सांगली -, सातारा, कोल्हापूर
(कालावधी -1980-2020)

संशोधन केंद्र - इतिहास
पानसरे महाविद्यालय अर्जापूर तानांदेड .बिलोली जि .

संशोधक

श्रीयुवराज जगन्नाथ कापसे .
M.A., B.Ed. SET
मुसांगली .वाळवा जि .वाटेगाव ता .पो .
मो .नं .7796554836

मार्गदर्शक

डॉकातळे .सुरेश अ .
(एम.ए ., एम.फिल ., पीएच((इतिहास) .डी .
इतिहास विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
शहिद भगतसिह महाविद्यालय, किल्लारी
तालातूर .औसा जि .
मो .न .8329003076

अनुक्रमणिका

अ. न.	तपशिल	पान नं.
1	प्रस्तावना	३
2	विषय निवडीचे महत्व	४
3	विषयाचे स्वरूप	५
4	विषयाची व्याप्ती	५
5	संशोधनाची उद्दिष्टे	५
6	संशोधनाची गृहीतके	६
7	संशोधन समस्या	६
8	संशोधन क्षेत्र	७
9	संशोधन पद्धती	७
10	पूर्व संशोधनाचा आढावा	७
11	प्रकरण निहाय रचना	११
12	संदर्भसूची	१४

1. प्रस्तावना

समाजपरिवर्तनात सामाजिक चळवळींना अत्यंत महत्व असते. विशेषतः भारतात तसेच महाराष्ट्रात गेली कित्येक शतके अशा सामाजिक चळवळी झालेल्या असून आजही त्या सुरू आहेत. समाजातील उपेक्षित, वंचित, शोषित घटकांना त्यांचा हक्क व न्याय मिळवून देण्यासाठी सामाजिक चळवळींच्या माध्यमातून लोक लढे उभारले गेले. आणि या जनआंदोलनाद्वारे वंचित घटकाना न्याय मिळत गेला. समाजाच्या अशा अनेक स्तरांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे शोषित, वंचित घटक आपणास पहावयास मिळतात. ज्यावेळी या शोषित घटकांना आपल्यावरील अन्यायाची किंवा शोषणाची जाणीव तीव्र स्वरूपात होते. त्यावेळी त्यांच्यातले काही पेटून उठतात, असे काही लोक एकत्रित येऊन इतरांना जागृत करतात. त्यातून संघटन बनते. संघटनाला नेतृत्व प्राप्त होते. त्याचे विशिष्टउदिष्ट, ठरवूनकार्यक्रम आखण्यात येतो व हा समूह ऐक्याने सामूहिक कृती कार्यक्रम चालवितो. उद्दिष्टे पूर्ण होईपर्यंत सातत्याने कृती सुरुच राहते व हयाच सामूहिक कृतीला सामाजिक चळवळीचे स्वरूप प्राप्त होते. सामाजिक चळवळी ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे आणि जनआंदोलने एखादया प्रासंगिक प्रश्नावर केले जात असले तरी तत्वतः सामाजिक चळवळी व जनआंदोलन यात फरक करता येत नाही. या सामाजिक चळवळीनी समाजाच्या उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्थापित परिस्थितीत बदल किंवा परिवर्तन हाच प्रयत्न त्यातला मुख्य आशय मानावा लागेल. “सामाजिक परिवर्तन घडवा!” असे अनेकांच्या मनात असले तरी त्यातून आंदोलन होतनाही. त्यांची मानसिकता ही स्वताहूनहालचाल करण्याची नसते. परंतु जेव्हा समाजातील विचारवंत परिवर्तनवादी विचार मांडून समाजातील लोकांना अगर समुहांना प्रेरित करतात, तेव्हा लोकांच्या अंतर्मनात दडलेला अंसतोष हा प्रकट होऊ

लागतो. हे लोक सामाजिक परिवर्तनाचे निर्माते, प्रवर्तक ठरतात. त्यांच्या कृतीयुक्त चळवळीतूनच जनआदोलनांचा उगम होतो.

" सामाजिक चळवळ हा असा एक सामूहिक प्रयत्न आहे की ज्यातून जीवनाची नवीन व्यवस्था निर्माण होते. " **- हर्बर्ट ब्लूमर**

" समाजात सामूहिक स्तरावर अनुभवल्या जाणाऱ्या समस्यांच्या सोडवणूकीसाठी फार मोठ्या प्रमाणावर करण्यात आलेल्या चळवळीला सामाजिक चळवळ म्हणतात. " **- हन्स टॉच**

अशा अनेक चळवळी आपणास दिसून येतात. सर्वच चळवळी विषम समाजव्यवस्थे विरुद्ध असतात. त्यातील काही निवडक सामाजिक चळवळींची जनआंदोलने ह्या शोध प्रबंधनात मांडण्यात येणार आहेत.

2. विषय निवडीचे महत्व

भारतीय इतिहासात लोकलढ्यांना अत्यंत महत्वाचे स्थान आहे. भारतीय समाजजीवनावर या लढ्यांचे प्रदीर्घ असे परिणाम झालेले दिसून येतात. सामाजिक घडामोडीची स्थित्यंतरे ही अगदी तळागाळातील व्यक्तींच्यापर्यंत पोहचतात. पश्चिम महाराष्ट्र, अशाच बदलत्या सामाजिक स्थित्यंतरांचा भाग आहे. पश्चिम महाराष्ट्रातील झालेली सामाजिक, वैचारीक, आर्थिक, धार्मिक, स्थित्यंतरे भावी पिढी पुढे मांडणे गरजेचे आहे. तरच त्यांच्या मानवतावादी विचारांच्या कक्षा रुंदावतील. सामाजिक समस्यांचे कालपरत्वे झालेले बदल कशा प्रकारे महत्वाचे आहेत हे ह्या संशोधनातून ज्ञात होईल.

सामाजिक चळवळीतून निश्चित केलेली उदिष्टपूर्ती साध्य करण्यास दिलेले लोकलढे, मोर्चे, आंदोलने, उपोषणे व त्यातून मिळालेल्या यशापयशातूनसाधलेला सामाजिक समतोल पश्चिम महाराष्ट्राच्या विकासाला कसा पोषक ठरला आहे, हे भावी पिढी पुढे मांडणे गरजेचे आहे.

आजही पश्चिम महाराष्ट्रात या जनआंदोलनाचे अस्तित्व टिकून आहे. मानवी मूल्यांची जपणूक करणाऱ्या या चळवळी समाजात कशा लोकप्रिय ठरल्या आहेत व या चळवळीच्या विचारधारेचा आधार घेऊन समाज अधिक गतीशिल व विज्ञानवादी बनविण्यास सदरच्या संशोधन कार्याने मदत होईल.

3. विषयाचे स्वरूप :-

जनआंदोलने ही वंचित वर्ग, उपेक्षित वर्गाच्या कल्याणासाठी उभारली गेली. समाजाचा सामाजिक समतोल सामाजिक चळवळीच्या आधारे साधला गेला आहे. यामध्ये शेतकरी वर्ग,धरणग्रस्त, अशिक्षित वर्ग, शोषित वर्ग, यांनी चळवळीच्या आधारे विषमते विरुद्ध लढा पुकारून झालेला सामाजिक, राजकीय, धार्मिक बदलाचा परिणाम अन्य घटकावरही पडलेला आहे.या जनआंदोलनामुळेच प्रत्येक स्तरात सामाजिक समतोल साधला आहे. प्रस्तुत प्रबंधातून पश्चिम महाराष्ट्राच्या सांगली, सातारा, कोल्हापूर या जिल्हयातील लोकलढ्यांचा ऐतिहासिक दृष्ट्या अभ्यास या प्रबंधनात होणार आहे.

4. विषयाची व्याप्ती :-

भारतात तसेच महाराष्ट्रात संघटित तसेच असंघटित जनआंदोलने उभी राहिली. त्यानी आपल्या लोकलढ्याद्वारे पाणीप्रश्न, औद्योगिकिकरण, शेतकरी, दीनदलित, कष्टकरी, धरणग्रस्त, पर्यावरण या क्षेत्रात बदल घडवूनआणले. या सर्व क्षेत्राचा अभ्यास प्रस्तुत शोध प्रबंधात करणार आहे.

5. संशोधनाची उद्दिष्टे -

१. महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीचा अभ्यास करणे.
२. पश्चिम महाराष्ट्रातील जनआंदोलन करणार-या संघटनांची माहिती जाणून घेणे.

३. सामाजिक संघटना समाजातील प्रश्न,समस्या कश्या प्रकारे सोडवतात ते जाणून घेणे.
४. जन आंदोलनातील सहभागी घटकांचा अभ्यास करणे.
५. जन आंदोलनामुळे तयार झालेल्या सामाजिकपरिणामांचा अभ्यास करणे.
६. जन आंदोलनातील विविध घटकांचे परस्पर संबंध अभ्यासणे.

6. संशोधनाचीगृहीतके :

१. महाराष्ट्रामध्ये सामाजिक, राजकीय, चळवळी अस्तित्वात असलेल्या दिसून येतात.
२. पश्चिम महाराष्ट्रात जनआंदोलने करणार-या काही संघटना दिसून येतात.
३. समाजामधील विविध समस्या, प्रश्न सोडवणे यासाठी काही सामाजिक संघटना जनआंदोलनाच्या माध्यामातून आंदोलन करताना दिसतात.
४. जनआंदोलनामध्ये समाजातील मानवी समुह व हितसंबधी गट सहभागी असलेला दिसून येतो.
५. जनआंदोलनाच्या माध्यमातून परिवर्तनाचे निर्णय प्रक्रिया घडलेली दिसून येते.
६. जनआंदोलनाच्या प्रभावामुळे अनेक सामाजिक निर्णय शासन स्तरावर झालेले दिसून येतात.
७. जनआंदोलन करणाऱ्या संघटना, समाज, शासन, राजकीय पक्ष यांचे परस्पर संबंध पूरक असतात.

7. संशोधन समस्या :-

पश्चिम महाराष्ट्रातील जनआंदोलनचा अभ्यास एतिहसिक संशोधन पद्धतीने झालेला नाही. ही सदर संशोधनाची उणीव आहे.

8. संशोधन क्षेत्र

सदर संशोधन प्रबंधामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील जनआंदोलनाचा आढावा घेत असताना इ.स.१९८० ते इ.स. २०२० पर्यंतचा पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्हयातील जनआंदोलनांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

9. संशोधन पद्धती-

प्रस्तुत विषयाची मांडणी करतानाप्रामुख्याने संशोधन पद्धतीमध्ये अधिक वास्तव निष्कर्ष काढता यावेत यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करणार आहे. त्याचबरोबर संदर्भ पद्धत, प्रश्नावली, मुलाखत, सर्वेक्षण या पद्धतींचा वापर करून सदरचे संशोधन पूर्ण केले जाईल. यात प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

10. पूर्व संशोधनाचा आढावा :-

प्रस्तुत शोध प्रबंधाच्या विषयासंदर्भात जरी प्राथमिक स्वरुपाची साहित्य साधने कमी प्राप्त करून संशोधन काटेकोर पद्धतीने केले जाईल. तसेच मानव्यशास्त्राच्या इतर ज्ञानशाखांमध्ये उपलब्ध असलेल्या साधनांचा आढावा घेणे. विषयाच्या विविध घटकांच्या आकलनासाठी उपयोगी ठरेल.

1. The Social Movements Reade : Cases and Concepts (2014)

जेफ गुडविन व जेम्स् यासपर यांच्या प्रस्तुत ग्रंथात सामाजिक चळवळ याची व्याख्या व स्वरूप स्पष्ट करण्यासाठी समूह मानसशास्त्रापासून समाजशास्त्रापर्यंत उपलब्ध असणाऱ्या प्रारूपांचा वापर

केला आहे. चळवळींचा उगम व त्यासाठी कारणीभूत असणारी सामाजिक व राजकीय परिस्थिती यांचा सखोल अभ्यास केलेला आहे. या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे विविध सैद्धांतिक मुद्यांच्या विवेचनासाठी विविध जनचळवळींचे संदर्भ वापरण्यात आले आहेत. हा ग्रंथ जागतिक पातळीवर महत्त्वाचे असणारे संदर्भ योग्य अशा सैद्धांतिक चौकटीत प्रस्तुत करतो.

2. Reinventing Revolution, New Social Movements and the Socialist Tradition in India (1993)

गेल ऑमवेट या ग्रंथात भारतात निर्माण झालेल्या जनचळवळींचा आढावा घेतात. विशेषकरून जात नष्ट करण्यासाठी उभारल्या गेलेल्या चळवळी, प्रत्यक्ष चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्या असल्यामुळे त्यांच्या लिखाणाला विशेष अशी वैधता लाभते. सामाजिक व आर्थिक विषमतेमुळे जनसामान्यांमध्ये प्रस्थापित समाज व्यवस्थेसंदर्भात असंतोष निर्माण होतो. त्यातून पुढे चळवळी निर्माण होतात. ही चळवळींची जन्मप्रक्रिया या प्रस्तुत ग्रंथात उदारहरणासह स्पष्ट होते. या चळवळींचा देशाच्या राजकारणावर झालेला परिणाम या ग्रंथात पहायला मिळतो.

3. Comparative Perspectives on Social Movements (1996)

डग मॅकडॅम, जॉन डी. कार्थी आणि मेअर एन. झाल्ड यांनी संपादित केलेल्या ग्रंथात सामाजिक चळवळींना एका राजकीय संधी या दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. जनचळवळीमधून उठवलेले सामाजिक प्रश्न व त्यामुळे चळवळीच्या नेतृत्वाला मिळालेली राजकीय संधी याचा परस्पर संबंध लावण्यात आला आहे. भारतात देखील जनचळवळींद्वारा उदयास आलेले राजकीय पक्ष पहायला मिळतात. आंबेडकरवादी चळवळीतून उदयास आलेला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, शेतकरी व कामगार यांच्या चळवळीतून निर्माण झालेला शेतकरी-कामगार पक्ष (शेकाप), राजू शेट्टी यांच्या शेतकरी चळवळीतून निर्माण झालेला स्वाभिमानी शेतकरी पक्ष यांची उदाहरणे देता येतील.

4. भारतातील सामाजिक चळवळी (२०११)

घनशाम शहा यांचाच हा दुसरा ग्रंथ. भारतातील विविध सामाजिक चळवळींचाआढावा घेतो. स्वातंत्र्यानंतर निर्माण झालेले सामाजिक प्रश्न, त्यांची तत्कालीन व स्थानिक पातळीवरील कारणे, असंघटनात्मक व व्यक्तिगत पातळीवर उभारण्यात आलेले लढे व त्याचे पुढे जनचळवळीत झालेले रूपांतर यांचा आढावा घेण्याचे काम हा ग्रंथ रतो. या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणेज यातील प्रकरणे केवळ सामाजिक चळवळींचा इतिहास सांगत नाहीत तर त्याचबरोबर त्यासंदर्भात झालेले लिखाणाचे परिशीलन केले आहे. त्यामुळे चळवळ व तीची सामाजिक प्रेरणा याचा अंदाज येतोच पण त्याबरोबरच त्या संदर्भात काम करणाऱ्या संशोधकांच्या कामाचा आढावाही उपलब्ध होतो. प्रस्तुत ग्रंथ या शोध प्रबंधात दुय्यम साहित्य साधन म्हणून वारंवार वापरले आहे.

5. सामाजिक चळवळी आणि सरकार (२००९)

घनशाम शहा यांनी संपादित केलेल्या या ग्रंथात सामाजिक चळवळींची सैद्धांतिक मांडणी व भारतात निर्माण झालेल्या जनचळवळी व त्याला शासनाने दिलेला प्रतिसाद या विषयावर देशभरातील विचारवंतांनी लिहीलेले लेख आहेत. प्रस्तावनेत सामाजिक चळवळींची सर्वंकष व्याख्या करण्यात आली असून दुसऱ्या प्रकरणात सामाजिक चळवळींवरील नऊ प्रबंधांचे विवेचन केलेले आहे. पुढे प्रत्येक प्रकरण भारतातील एका जनचळवळीचा सविस्तर असा आढावा घेते. या सर्वच लेखांचे वैशिष्ट्य म्हणजे हे लेख फक्त जनचळवळींचा इतिहास सांगण्यासाठी लिहीले गेलेले नाहीत. तर या चळवळींना शासनाने दिलेल्या प्रतिसादाच्या संदर्भात विश्लेषण केले आहे. संदर्भासाठी दिलेली आकडेवारी व दुय्यम साहित्य साधनांच्या योग्य वापरामुळे विवेचन अर्थपूर्ण होते. शेतकऱ्यांचे तेलंगणातील बंड, नक्षलबारीतील डावी चळवळ, १९८२ साली झालेले संघटित कामगारांचे बंद, आदिवासी चळवळी, दलित व स्त्रियांच्या चळवळी, गुजरात व

बिहारमधील विद्यार्थी आंदोलने या विविध विषयावर लेख आहेत. ज्यांचा उपयोग प्रस्तुत प्रबंधात सामाजिक चळवळीविषयक एक ग्रहणक्षम वैचारिक चौकट तयार करण्यामध्ये होतो.

6. शेतकरी संघटना (२००८) विचार आणि कार्यपद्धती:

शरद जोशी यांनी अंबाजोगाई २६येथे (बीड), २७ फेब्रुवारी १९८१ मध्ये आयोजित केलेल्या प्रशिक्षण शिबीरात शेतकरी संघटनेचे विचार आणि कार्यपद्धतीचीचर्चाकरताना जे शेतीचे अर्थशास्त्र सांगण्यात आले, त्यावरून शेतकरी संघटनेचे बायबलम्हटले गेलेल्या 'शेतकरी संघटनाणि विचार आ : कार्यपद्धती' या ग्रंथाची निर्मिती झाली.प्रस्तुत ग्रंथात शेतीमालाला उत्पादन खर्चाच्या तुलनेत शासन व व्यापाऱ्यांकडूनबाजारपेठेमध्ये कमी दर देवून शेतकऱ्यांचे कसे शोषण केले जाते त्याविषयी विवेचन केले आहेमहाराष्ट्रातही हे शोषण थांबविण्यासाठी भारतातील अन्य राज्याप्रमाणे . १९८० च्या दशकापासून शेतकरी चळवळी, आंदोलन का प्रभावी ठरली याची मीमांसा केलीया .शेतकरी आंदोलनाचे अंतिम उद्दिष्टे, हेतू काय? हे सांगताना शरद जोशी शेतीमालालाउत्पादन खर्चावर आधारित रास्त व किफायतशीर हमीभाव मिळवून देण्याबरोबरच सर्वदेशातील दारिद्रय, गरीबी हटवणे हे असल्याचे सांगतात.

7. बदलता महाराष्ट्र -साठोत्तर परिवर्तनाचा मागोवा (२००३)

प्रस्तुत ग्रंथामध्ये भोळे भास्कर व बेडकिहाळ किशोर यांच्या संपादित साठोत्तरमहाराष्ट्रातील विविध विषयांना स्पर्श करणाऱ्या लेखांचा संग्रह आहे . यामध्ये साठोत्तरमहाराष्ट्राचे बदलते राजकारण, महाराष्ट्राचे अर्थमान, महाराष्ट्रातील औद्योगिक विकास,महाराष्ट्रातील शिक्षण, साठोत्तर मराठी साहित्य, साठोत्तर मराठी रंगभूमी, मराठी चित्रपट,बदलती पत्रकारिता, मराठी भाषेची स्थिती, महाराष्ट्रातील बदलते स्त्री.जीवन इ-विषयासंदर्भात सखोल विवेचन करणारे लेख आहेतत्याचबरोबर महाराष्ट्रातील साठोत् .तर सहकारी चळवळ, महाराष्ट्रातील पर्यायी विकासाच्या चळवळी, बदलत्या

महाराष्ट्रातीलकामगार चळवळ शेवटी साठोत्तर महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी इत्यादी विषयाशी निगडीत विश्लेषणात्मक विवेचन करणारे लेख समाविष्ट आहेत.

8. सामाजिक आंदोलने (१९८६)

प्रस्तुत ग्रंथात गुरूनाथ नाडगोंडे यांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातभारतातील विविध प्रांतातील शेतकरी व शेतमजूर यांच्या आंदोलनाची मीमांसा केलीआहे १९८० :विशेषत) त्याचबरोबर देशातील आजच्या शेतकरी चळवळींची . (नंतरच्याकारणमीमांसा केली आहेनाडगोंडे यांच्या मते ., स्वातंत्र्योत्तर हरितक्रांतीच्या रोखानेनियोजनबद्ध पावले टाकण्यात आलीपण हरितक्रांतीचा लाभ लहान जमिनधारक . वभूमिहीन मजूर यांना न होता तो लाभ बड्या शेतकऱ्यांनाच झाला . हरितक्रांतीबरोबरचजमीनसुधारणा कार्यक्रम हाती घेण्यात आलाहा पहिल्या पंचवार्षिक . योजनेतील महत्त्वाचा कार्यक्रम होता!उदात्त हेतूंनी प्रेरित झालेला हा कार्यक्रम शेवटी वांझोटाच ठरला . अपेक्षेप्रमाणे या कार्यक्रमाला यश लाभले असते तर शेतकयांना व शेममजूरांना - आजआंदोलन करावे लागले नसतेक्रमाचा ढाचा योग्य असूनही जमिनसुधारणा कार्य . हाकार्यक्रम यशस्वी का होवू शकला नाही याची कारणमिमाँसा सदर ग्रँथात केली आहे.

11. प्रकरण निहाय रचना :-

प्रस्तुत संशोधन प्रबंध 8 प्रकरणात विभागला असून प्रबंधाच्या स्वरूपाच्या आकलनासाठी त्यातील आशयाचे प्रकरणनिहाय थोडक्यात पुढिल प्रमाणे प्रकरणे मांडण्यात आले आहे.

1. प्रस्तावना
2. शेतकरी चळवळ
3. अंधश्रध्दा निर्मूलन चळवळ
4. धरणग्रस्त व पुनर्वसन चळवळ
5. समन्यायी पाणीवाटप चळवळ
6. विद्रोही चळवळ

7. जनआंदोलन चळवळीँचे मूल्यमापन
8. उपसहार व निष्कर्ष

1. प्रस्तावना

मानव हा समाजशिल प्राणी आहे. सामाजिक ऐक्य असेल तो समाजात सुखाने राहु शकतो. सामाजिक विषमता दूर करण्यासाठी जनआंदोलन उभारली गेली. त्यातूनच सामाजिक चळवळींनी व्यापक स्वरूप धारण केले. अशा अनेक सामाजिक चळवळींचा थोडक्यात मागोवा या प्रकरणात मांडणार आहे.

2. शेतकरी चळवळीची सामाजिक भूमिका :

पश्चिम महाराष्ट्र हा कृष्णा वारणा कोयना पंचगंगा या नदयांनी समृद्‌ध असलेला प्रदेश येथील बहुतांश लोक शेती हाच व्यवसाय करतात. शेतमाल व पुरक व्यवसायांना योग्य हमी मिळावी. शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक थांबली जावी यासाठी शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटनेची स्थापना झाली. त्यातून शेतकऱ्यांची आंदोलने उभारली गेली. त्यातून मिळालेली निष्पत्ती शेतकऱ्यांच्या सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक जीवनावर झालेला परिणाम या प्रकरणात अभ्यासला जाईल.

3. अंधश्रद्‌धा निर्मूलन चळवळ :

समाजाचे अज्ञान दूर करून समाजाला जागृत करण्यासाठी व समाजाला वैज्ञानिक दृष्टीकोन, वास्तवता याचे भान ठेवण्यासाठी या चळवळीने समाजात एक नवचैतन्य आणले. समाजाजीवनात आमुलाग्र बदल अंधश्रद्‌धा निर्मूलन चळवळीने झाले आहे. याचा अभ्यास या प्रकरणात करणार आहे.

४. धरणग्रस्त व पूर्नवसन चळवळ :

स्वातंत्र्योत्तर काळात बांधण्यात आलेल्या मोठ्या धरणामुळे देश्याच्या व अनुषंगाने पश्चिम महाराष्ट्राच्या राजकारणात, समाजकारणात,

अर्थकारणात अत्यंत महत्वाचे बदल घडून आले. परंतु या धरणामुळेच विस्थापित झालेल्या लोकांच्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी डॉ. भारत पाटणकर, नागनाथ अण्णा नायकवडी यांनी जी चळवळ उभी केली तिची यशापशय या प्रकरणात मांडणार आहे.

५. समन्यायी पाणी वाटप चळवळ

समन्यायी पाणी वाटपाची चळवळ प्रथम १९८० च्या दशकात पश्चिम महाराष्ट्रात सांगली जिल्यातील खानापूर या दृष्क ग्रस्त तालुक्यामधून सुरु झालेचे पहावयास मिळते. त्यासाठी श्रमिक मुक्ती दलाच्या कार्यकर्त्यांनी मुक्ती संघर्ष हि चळवळ उभारली. डॉ. भारत पाटणकर यांनी ग्रामीण भागातील दृष्काळाची हि चळवळ उभारली. या प्रकरणात समन्यायी पाणी वाटप चळवळीचा ऐतिहासिक अभ्यास मांडणार आहे.

6. विद्रोही चळवळ

समाजातील रूढी, प्रथा, परंपरा, परंपरागत साहित्य यांना विरोध करून जगा आणि जगू द्या. या तत्वज्ञानाचा वापर करून परंपरागत साहित्याला विरोध करून नवसाहित्याची रचना या चळवळीने केली आहे. या चळवळीच्या आंदोलनाने समाजावर झालेला सामाजिक, सांस्कृतिक बदल अभ्यासणार आहे.

7. जनआंदोलन चळवळींचे मूल्यमापन

वरील सर्वच चळवळीचे मूल्यमापन सदर प्रकरणात करण्यात येणार आहे. सर्वच चळवळीना एतिहासिक संदर्भ आहेत. त्यातून सदर चळवळी विकसित होत गेल्या आहेत.

8. उपसहार व निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणात संपूर्ण प्रकरणाचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच वरील जनआदोलनाच्या बाबतीत निष्कर्ष मांडले जाणार आहेत. एतिहासिक चळवळीच्या बाबतीत वरील चळवळीसाठी उपाययोजना व शिफारशी सुचविण्यात येणार आहेत.

12. संदर्भसूची

1. दाभोळकर नरेंद्र, “तिमिरातुनी तेजाकडे”, राजहंस प्रकाशन, पुणे. आवृत्ती सहावी, फेब्रु २०१४
2. दाभोळकर नरेंद्र, “विवेकाची पताका होऊ खांदयवरी”, दिलीपराज प्रकाशन, पुणे., व्दितीयावृत्ती, २०१३
3. दाभोळकर नरेंद्र, “लढे अंधश्रद्धेचे”, साधना प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, डिसें.२०१४
4. दाभोळकर नरेंद्र, “कायदा व चिकित्सा”, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र, सांगली, मे २०१६
5. दाभोळकर नरेंद्र, “कायदा व चिकित्सा”, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र, सांगली, मे २०१६
6. सहस्त्रबुद्धे पु. ग., “महाराष्ट्र संस्कृती”, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, मुंबई, द्वितीयावृत्ती, १९९४
7. वर्मा, ओ. पी., “सामाजिक नियंत्रण एवं परिवर्तन”, विकास प्रकाशन, कानपुर, २००४
8. लोटे रा. ज., “समाजशास्त्र मूलभूत संकल्पना”, पिंपळापुरे अँड पब्लिशर्स, नागपूर, १९९६
9. नानावटी प्रभाकर, “भारतातील रॅशनालिस्ट चळवळ”, आजचा सुधारक, नागपूर, मार्च २०१५
10. नाडगोंडे गुरुनाथ, “सामाजिक संशोधन पद्धती”, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९९
11. मेहंदळे य. श्री., “समाजशास्त्राची मूलतत्वे”, मेहंदळे प्रकाशन, पुणे, १९६९, पृ. ४००
12. महाजन धर्मवीर,“प्रारंभिक समाजशास्त्र”, मेहता पब्लिशिंग हाऊस, दिल्ली, २००४

13. मून वसंत (संपा.), “बहिष्कृत भारतातील अग्रलेख”, शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९८४
14. पानसे रमेश (संपा.), “महाराष्ट्रातील समाज परिवर्तनाच्या दिशा”, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९८९

मासिके -

1 परिवर्तनाचा वाटसरु
2 प्रहार
3 महाराष्ट्र टाईम्स
4 लढा
5 लोकसत्ता
6 विचारमंथन मासिक,
7 विवेक जागर
8 युगांतर
9 अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र
10 आजचा सुधारक
11 अंतर्नाद

English -

1. Ommen, T.K., “Socialogical Issue in the Analysis of Social Movement in India”, Socialogical Bulletin. Vol. 26, No.1, March 1977
2. Paul, Wilkinson, “Social Movement”, The Macmillan Press Ltd. London, 1971
3. Percival, Spear, “A history of India”, Vol-2 Penguin Book LTD. Delhi, 1965
4. Radhakrishna, S & Moore, “C. A., A Source book in Indian philosiophy”, Princeton University Press, New Jersey, 1967
5. Ranade M. G., “Rise of Maratha Power”, Bombay, 1883
6. Rao, M.S.A., “Social Movement in India”, Manohar Publication, New Delhi, 1984
7. Goode William &Hatt Paul, “Method in Social Research”, McGraw Hill Book Co. London, 1952
8. Goodwin, Jeff and Jasper, James M.Ed., “The Social Movements Reader : Cases and Concepts”, USA : John Wiley & Sons Ltd. 2014
9. Johnson, Harry, M, “Sociology A systamatic Introduction”, Allied Pub., Collombia, New Yark, 1967, Pg. 441